**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक ०६ सप्टेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **देशातील एकूण गुंतवणुकीच्या 52 पूर्णांक 46 टक्के परकीय गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आल्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती.**
2. **वन विकास महांडळाकडून राज्य शासनाला ५ कोटी ८२ लाखाचा लाभांश सुपूर्द.**
3. **आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी १५ हजार ३६० कोटींची तरतूद केल्याची आलापल्ली इथं जनसन्मान यात्रेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती.**
4. **उद्या पासून सुरु होणाऱ्या गणेशउत्सवाचा सर्वत्र उत्साह; स्थानिक प्रशासनातर्फे विसर्जन कुंडांची सज्जता.**

   **आणि**
5. **पॅरिस ऑलिम्पिकमध्ये प्रवीण कुमार याची उंच उडी स्पर्धेत सुवर्ण कामगिरी.**

****

गुंतवणूक फडणवीस

परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात मागील दोन वर्षांपासून सातत्यानं देशात अव्वल स्थानी असलेल्या महाराष्ट्रानं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतही हे स्थान टिकवून ठेवलं आहे. एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत देशातल्या एकूण गुंतवणुकीच्या ५२ पूर्णांक ४६ शतांश टक्के म्हणजेच सुमारे ७० हजार ७९५ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एक्स माध्यमाद्वारे ही माहिती दिली. इतर आठ राज्यांमधल्या परकीय गुंतवणुकीच्या बेरजेपेक्षा अधिक गुंतवणूक आणण्यात राज्य सरकार यशस्वी झाल्याचं त्यांनी सांगितलं. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर कर्नाटक, तिसऱ्या क्रमांकावर दिल्ली, चौथ्या क्रमांकावर तेलंगणा तर पाचव्या क्रमांकावर गुजरात या राज्यांचा समावेश आहे.

वन विकास महामंडळ लाभांश

सन १९८८-८९ पासून सातत्याने नफा अर्जित करणाऱ्या वन विकास महामंडळाने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात आतापर्यंतचा सर्वाधिक ५ कोटी ८२ लक्ष रुपयांचा लाभांश राज्य शासनाला दिला असून, या रकमेचा धनादेश राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नुकताच सुपूर्द केला. यावेळी शिंदे यांनी समाधान व्यक्त करत वन विभागाच्या कार्याचं कौतुक केलं. यावेळी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करताना मुनगंटीवार यांनी एफडिसिएम अर्थात वनविकास महांडळाच्या वाटचालीची माहिती दिली. नुकतच एफडीसीएमने आलापल्ली आणि बल्लारशा इथं आरा गिरणी स्थापित करुन कट साईज टिंबर विक्रीच्या क्षेत्रात पदार्पण केलं आहे. गुणवत्तापुर्ण सागाची निर्यात करुन जागतिक बाजारात प्रवेश करण्यासाठी एफडीसीएमने आंतरराष्ट्रीय स्तराचे एफएससी प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही देखील सुरु केली आहे. दरम्यान चंद्रपूर जिल्ह्यातून पुन्हा एकदा सागवान लाकूड दिल्लीला पाठवलं जाणार आहे. यापूर्वी राम मंदिर, नवे संसद भवन आणि भारत मंडपम या वास्तुंसाठी सागवान

पाठवण्यात आलं होतं. आता पंतप्रधान कार्यालयासाठी सुमारे तीन हजार घनफूट सागवान पाठवलं जाणार असल्याची माहिती मुनगंटीवार यांनी दिली आहे.

अजित पवार

आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी राज्य सरकारने १५ हजार ३६० कोटी रुपयांची तरतूद केली असून या समाजावर कधीही अन्याय होऊ देणार नाही, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज आलापल्ली इथं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित जनसन्मान यात्रेत केलं. यावेळी अन्न आणि औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण उपस्थित होते. सरकारने प्रत्येक घटकासाठी भरीव कार्य केलं आहे. दलितांसाठी बार्टी, ओबीसींसाठी महाज्योती, मुस्लिम समाजासाठी मार्टी अशा अनेक योजना सुरू केल्या. महिलांसाठी लाडकी बहीण, मोफत सिलिंडर, ११ वी पासून मुलींना मोफत शिक्षण इत्यादी योजनांद्वारे महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असं पवार यावेळी म्हणाले. भारतीय संविधान कुणीही बदलू शकत नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. या कार्यक्रमापूर्वी पवार यांनी नागेपल्ली येथील महिलांशी लाडकी बहीण योजनेच्या लाभाविषयी संवाद साधला.

सुप्रिया सुळे

महाविकास आघाडीचं सरकार इडी, आयकर खाते आणि सीबीआयच्या भीतीने पाडलं गेलं. महायुतीमध्ये प्रचंड अडचणी असल्यामुळे हे सरकार पडेल, असं मत खासदार सुप्रिया सुळे यांनी आज मुंबईत पत्रकारांशी बोलताना व्यक्त केलं.
या सरकाने सुरु केलेली लाडकी बहिण योजना म्हणजे राजकीय पोळी भाजण्यासाठी सुरु केलेली योजना आहे. एका बाजूला राज्यात गुंतवणूक आली म्हणतात मात्र राज्यात नोकऱ्या कुठेच उपलब्ध नाहीत. सामंजस्य करार झाल्यानंतर प्रत्यक्षात गुंतवणूक किती आली याबद्दल सुळे यांनी अविश्वास व्यक्त केला.

‘खर्चे पे चर्चा’

निवडणुकीच्या तोंडावर महागाई कमी करण्याचं आश्वासन देऊन भाजप महिलांची फसवणूक करत आहे. महागाईमुळे सण, उत्सावाचा रंग फिका पडला आहे. या महागाईने जनता त्रस्त आहे. त्यामुळे भाजप सरकारला जाग आणण्यासाठी महिला काँग्रेस राज्यभरात ‘खर्चे पे चर्चा’ अभियान राबवणार आहे, अशी माहिती महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष अलका लांबा यांनी आज मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

हंसराज अहिर

महाराष्ट्रातील विविध जिल्हयांमध्ये वास्तव्य करणाऱ्या नाभिक, धोबी, शिंपी, कलार यांसह अन्य मायक्रो ओबीसी बांधवांच्या सामाजिक तसंच संवैधानिक न्याय अधिकारांसाठी त्याचबरोबर त्यांना भेडसावणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि रोजगार विषयक समस्यांवर विचारविमर्ष करून हे प्रश्न मार्गी लावण्याकरिता राष्ट्रीय मागासवर्ग आयोग आग्रही असल्याचं अध्यक्ष हंसराज अहीर यांनी म्हटलं आहे. मुंबई येथे पार पडलेल्या बैठकीत ओबीसी समाजाशी निगडीत अनेक ज्वलंत विषयांवर सविस्तर चर्चा झाली. शिक्षण, नोकरी, पदोन्नती, शिष्यवृत्ती आदी बाबींची पुर्तता करवून घेण्यात आयोग आग्रही आणि सक्षम असल्याचं अहीर यांनी सांगितलं.

एन ई एक्स टी

आयुर्वेद, युनानी आणि होमिओपॅथी शाखांमध्ये २०२१-२२ पासून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना नॅशनल एक्झिट टेस्ट अर्थात एन ई एक्स टी देणं अनिवार्य असणार आहे अशी घोषणा केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी काल केली. या संदर्भात विद्यार्थ्यांच्या शंकांचं निरसन करण्याच्या दृष्टीनं स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार हा निर्णय घेण्यात आल्याचं त्यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमध्यमांशी बोलताना सांगितलं. एक वर्षाची आंतरवासिता अर्थात इंटर्नशीप पूर्ण केल्यानंतर राज्य अथवा राष्ट्रीय स्तरावर परवाना मिळवण्यासाठी तसंच नोंदणी करण्यासाठी ही परीक्षा देणं अनिवार्य राहील.

गणेशउत्सव

महाराष्ट्रात गणेशोत्सवाची धामधुम सुरू झाली आहे. गणेश चतुर्थीच्या दिवशी उद्या राज्यात सर्वत्र श्री गणेशाची प्रतिष्ठापना होणार आहे. त्यामुळे आज विविध ठिकाणच्या सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींचं आगमन होत आहे. नागपूरचा राजा आणि जुन्या नागपूरच्या भागात सार्वजनिक गणपती मूर्तीचं आगमन परवा पासूनच सुरु झालं आहे. मिरवणूक सुकर व्हाव्ही म्हणून मिरवणूकीच्या मार्गांवरील खड्डे बुजवून डागडुजी देखील करण्यात आली आहे. उत्सवासाठी आवश्यक सामानानं राज्यात सर्वत्र बाजारपेठा फुलल्या असून भाविक खरेदीसाठी गर्दी करत आहेत. हा उत्सव एकोप्याने आणि आनंदाने साजरा करण्याचं आवाहन स्थानिक प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे. दरम्यान, येत्या गणेशोत्सवात सार्वजनिक गणेश मंडळांना विधायक कार्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीनं अकोला जिल्हास्तरावर तीन आणि जिल्ह्यातील तालुकास्तरावर प्रत्येकी एक उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला अकोला जिल्हा प्रशासनाकडून गौरविण्यात येणार आहे. त्यासाठी अकोल्याचे उपविभागीय अधिकारी डॉक्टर शरद जावळे यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठित करण्यात आली आहे.

विसर्जन कुंड

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांद्वारे स्थापना करण्यात येणा-या श्रीगणेशाच्या मोठ्या मूर्तींच्या विसर्जनाकरिता कोराडी येथील विशाल आकाराच्या विसर्जन कुंडामध्ये व्यवस्था करण्यात आलेली आहे. या ठिकाणी प्रशासनाद्वारे सुरू असलेल्या तयारीचा नागपूर महानगरपालिका, नागपूर शहर पोलिस आणि नागपूर ग्रामिण प्रशासनाद्वारे आढावा घेण्यात आला.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार श्रीगणेशाच्या विजर्सनाकरिता नागपूर शहरातील सर्व तलावांमध्ये यावर्षी देखील पूर्णत: बंदी आहे. शहरातील दहाही झोन अंतर्गत विविध भागांमध्ये ४०० पेक्षा अधिक कृत्रिम विसर्जन कुंडांची व्यवस्था करण्यात येत आहे. या विसर्जन कुंडांमध्ये ४ फुट अथवा त्यापेक्षा कमी उंचीच्या श्रीगणेशाच्या मूर्तीचे विसर्जन करता येईल. ४ फुटापेक्षा अधिक उंचीच्या मूर्तींच्या विसर्जनासाठी कोराडी इथल्या कृत्रिम कुंडामध्येच करण्यात येणार आहे.

पॅरिस पॅरालिम्पिक

पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये उंच उडी T६४ स्पर्धेत प्रवीण कुमार याने आज सुवर्णपदकावर नाव कोरलं आहे. यासह भारताची पदकसंख्या ६ सुवर्ण, ९ रौप्य आणि ११ कांस्य पदकासह एकूण २६ इतकी झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्रवीण कुमारच्या यशाबद्दल अभिनंदन केलं आहे. मात्र पुरुष भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत दीपेश कुमारला सातव्या क्रमांकावर समाधान मानावं लागलं. आज भारोत्तोलन स्पर्धेत कस्तुरी राजामनी, महिला भालाफेक स्पर्धेत भावनाबेन चौधरी आणि शॉट पूट एफ-५७ प्रकारात सोमन राणा आणि होकातो सेमा पदकासाठी मैदानात उतरतील. आतापर्यंत एकूण २६ पादकांसह भारत पदक तालिकेतील चौदाव्या स्थानावर आहे.

आवास योजना पुरस्कार

केंद्र आणि  राज्य पुरस्कृत अशा दोन्ही आवास योजनांच्या अंमलबजावणीत सरस कामगिरीसाठी नागपूर  विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते आज गोंदिया जिल्ह्याला प्रथम क्रमांकाच्या पुरस्कारानं  गौरविण्यात आलं . प्रधानमंत्री आवास योजनेच्या पहिल्या टप्प्यांतर्गत विभागात २ लाख ८५ हजार घरकुलांच्या उद्दिष्टापैकी २ लाख ७३ हजार घरकुल बांधण्यात आली आहेत. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत  विभागातील जास्तीत-जास्त पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी वेळेत नोंदणी पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यंत्रणांना दिल्या. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना आणि  वर्ष २०२२-२३  साठी राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणारे जिल्हे, तालुके आणि  ग्रामपंचायतींना विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात बिदरी यांच्या हस्ते गौरविण्यात आलं.

जिल्हा परिषद

शिक्षक दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या शाळांवरील उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या १६ शिक्षकांना सन २०२४ या वर्षासाठी आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले. यात  १४ प्राथमिक तर दोन माध्यमिक शालेय शिक्षकांना आज रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष मुक्ता कोकड्डे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आलं. या प्रसंगी खासदार श्याम बर्वे, नागपुर विभागीय शिक्षक मतदार संघाचे विधान परिषद सदस्य सुधाकर आडबले,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी प्रामुख्यानं उपस्थित होते.

हवामान

विदर्भात आज भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येल्लो अलर्ट देण्यात आला आहे तर उर्वरित जिल्ह्यात हवामान सामान्य राहणार आहे.

******